# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping injured/ distressed persons**

**Police Station** :- **Washim Dist.**

**Date of Good Work done** :- **23/06/2022**

**Brief of the work done :-**

रस्ते अपघातातील जखमींना वेळेवर उपचाराकरिता मदत करून त्यांचा जीव वाचविणाऱ्या 'राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन बचाव पथका'तील 14 विद्यार्थ्यांचा पो.अ.श्री. बच्चन सिंह (भा.पो.से.) यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

## जखमींना मदत करणाऱ्यांचा सत्कार



वाशीम, ब्युरो. अपघातामधील जखमींना मदत करणाऱ्या व त्यांचे प्राण वाचविणाऱ्या विद्यार्थ्यांचा पोलिस अधीक्षक बच्चन सिंग यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती संलग्न साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा येथील राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकातील 14 विद्यार्थ्यांमार्फत मागील दोन वर्षांपासून सतत रस्ते अपघातांमध्ये जखमी होणाऱ्या शेकडो अपघातग्रस्त नागरिकांना वेळीच वैद्यकीय मदत देऊन त्यांचे जीव वाचविण्याचे कार्य करीत आहेत. याचबरोबर त्यांनी इतर नैसर्गिक व अनैसर्गिक अपघातांच्या घटनांमध्ये नागरिकांना मदत करणाऱ्या 14 विद्यार्थ्यांचा पोलिस अधीक्षक बच्चन सिंग यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा वाहतूक शाखेचे पोनि उदय सोयस्कर यांनी केले. सन्मानित विद्यार्थ्यांच्या वतीने आदित्य इंगोले यांनी त्यांचे पथकाचे कामकाज व त्यांचे अनुभव यांचे विषयी सर्वांना माहिती दिली. केंद्र शासन स्तरावर सुवर्णतास योजना सुरू करण्यात आलेली असून त्यामध्ये अपघातग्रस्त इसमांना मदत करणाऱ्या नागरिकांना बक्षीस म्हणून रोख रक्कम व प्रशस्तीपत्र सुद्धा देण्यात येणार आहे.

संत गाडगेबाबा विदयापीठ, अमरावती संलग्न साळुंकाबाई राऊत महाविद्यालय येथील राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकातील आदित्य इंगोले, नयन राठोड, सचिन राठोड, राहुल साखरे,अनिकेत इंगळे, बुध्दभुषण सुर्वे, प्रथम सिंकटवार, जगदेव अवगण, ज्ञानेश्वर खडसे, किर्तीराज भगत, ओम वानखडे, सुमित राठोड,प्रविण गावंडे व ऋषिकेश येवले यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाकंरीता वाहतुक शाखेचे पोनि उदय सोयस्कर, पोनि धनंजय जगदाळे आणि अंमलदार उपस्थित होते.